# मिरची लागवड तंत्रज्ञान

## ※ प्रस्तावना

मिरची ही नंदुरबार जिल्ह्यातील सर्वात महत्वाचे भाजीपाला पिक असून या पिकाला भौगोलिक मानांकन (GI) प्राप्त झाले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा, तळोदा,नंदुरबार आणि अक्कलकुवा तालुक्यामध्ये मिरचीची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते.रोजच्या आहारात मिरची ही अत्यावश्यक असते. बाजारात हिरव्या मिरचीस वर्षभर मागणी असते. याशिवाय भारतीय मिरचीस परदेशातून चांगली मागणी आहे. मिरची मध्ये अ आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असल्याने मिरचीचा संतुलीत आहारात समावेश होतो. तिखटपणा व स्वाद यामुळे मिरची महत्वाचे मसाल्याचे पिक आहे.मिरची मध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत, विशेषतः कर्करोगविरोधी गुणधर्म आणि झटपट वेदना निवारक म्हणून, आणि हे रक्तवाहिन्या विस्तारुन हृदयविकारांना प्रतिबंधित करते.

## ※ हवामान

मिरची पिकाची वाढ उष्ण आणि दमट हवामानात चांगली होते आणि उत्पादनही चांगले मिळते. या पिकाची लागवड पावसाळा, उन्हाळा, आणि हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्ये करता येते. बियांची उगवण १८ ते २७ अंश सेल्सिअस तापना मध्ये चांगली येते. पावसाळ्यात जास्त पाऊस आणि ढगाळ वातावरण असल्यामुळे फुलांची गळ जास्त होते. मिरचीला ४० इंचापेक्षा कमी पाऊस असणे चांगले असते. मिरचीच्या झाडांची आणि फळांची वाढ २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमानामध्ये चांगली होते. तापमानातील तफावतीमुळे फुले आणि फळे यांची गळ मोठ्या प्रमाणावर होते आणि उत्पादनामध्ये घट येते.

## ※ जमीन

मिरची लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी, मध्यम ते भारी जमिन गरजेची असते. हलक्या जमिनीत योग्य प्रमाणात सेंद्रिय खते वापरली, तरी देखील मिरचीचे पीक चांगले येते. पाण्याचा योग्य निचरा न होणाऱ्या जमिनी मध्ये मिरचीचे पीक अजिबात घेऊ नये. पावसाळ्यात आणि बागायती मिरचीसाठी मध्यम काळी आणि पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. तर उन्हाळ्यात मध्यम ते भारी जमिनीवर मिरची लागवड करावी. चुनखडी असलेल्या जमिनीतही मिरची पिकाचे उत्पादन चांगले होते.

## ※ सुधारित जाती

लागवडीसाठी फुले ज्योती, पुसा ज्वाला, पंत सी–१, अर्का लोहित, कोंकण किर्ती, अर्का मेघना या जातींची निवड करावी. खाजगी बियाण्यांमध्ये गौरी, शार्क–१, तेजस्विनी इत्यादी जातींची निवड करु शकता.

## ※ बियाणांचे प्रमाण

सुधारित वाणांसाठी बियाणे दर २०० ग्रॅम/एकर आणि संकरित जातींसाठी ८०–१०० ग्रॅम/एकर बियाणे वापरावे.

## ※ संजीवकाचा वापर

मिरचीच्या फुलांची गळ कमी करण्यासाठी १० ते २० पीपीएम तीव्रतेच्या एनएए संजीवकाची फवारणी करावी किंवा एक हेक्टर पिकांसाठी ४५० लीटर पाण्यात १०० मिली प्लॅनोफीक्स हे संजीवक मिसळून पीक फुलावर असताना फवारणी करावी.

## ※ रोपे तयार करणे

रोपे गादी वाफ्यावर तयार करावीत. गादी वाफ्यांचा आकार ३ मी.लांब X १ मी.रुंद १५ X सें. मी.उंच असावा. प्रति चौरस मीटर वाफ्यात ५ किलो शेणखत, ३५ ग्रॅम यूरिया,१०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट व २५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश वापरावे पेरणी करतांना दोन ओळीतील अंतर १० सें.मी. ठेवावे. रुजवा चांगला होण्यासाठी वाफे भाताच्या पेंढ्याणे आच्छादन करावे. उगवण होईपर्यंत वाफ्यांना नियमित पाणी द्यावे. उगवण झाल्यानंतर दोन दिवसांनी पाणी द्यावे. रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रत्येक वाफ्यास ५० ग्रॅम यूरिया द्यावा. पेरणीनंतर ४ ते ६ आठवड्यांनी रोपे पुर्नलागवडीसाठी योग्य होतात. एक हेक्टर लागवडीसाठी ८ ते १० आर क्षेत्रावरील रोपे पुरेशी होतात.

## ※ बीजप्रक्रिया

विविध मातीजन्य रोगांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी बीजप्रक्रिया आवश्यक आहे. पेरणीपूर्वी थॉयरम @ ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम @ २ ग्रॅम प्रति किलो बीजप्रक्रिया करावी. रासायनिक प्रक्रियेनंतर ट्रायकोडर्मा @ ५ ग्रॅम प्रति किलो किंवा स्यूडोमोनास फ्लूरोसेन्स १० ग्रॅम प्रति किलो बियाण्यावर प्रक्रिया करावी.विल्ट,शोषक किडीपासून संरक्षण करण्यासाठी, लावणीपूर्वी मुळे ट्रायकोडर्मा हारझियानम @ २० ग्रॅम /ली.+०.५ मिली/ली. इमिडाक्लोप्रिड या द्रावणामध्ये १५ मिमिटे बुडवावी.

## ※ लागवड तंत्र

मिरचीची लागवड खरीप आणि रब्बी पीक म्हणून करता येते. शिवाय ते इतर वेळीही लावले जातात. खरीप पिकासाठी मे ते जून, रब्बी पिकांसाठी सप्टेंबर ते ऑक्टोबर हे पेरणीचे महिने असतात ते उन्हाळी पिके म्हणून घेतले असल्यास जानेवारी–फेब्रुवारी महिने निवडले जातात. लागवडीचे अंतर सुधारित जातीसाठी ६० X ४५ सेंमी तर संकिरत वाणांसाठी ७५ X ६० सेंमी एवढ्या अंतरावर लागवड करावी.



फुले ज्योती



अर्का लोहित



कोंकण किर्ती



अर्का मेघना

**✲ खत व्यवस्थापन :** सेंद्रिय खताचा भरपूर वापर केल्याने उत्पादनात आणि गुणवत्तेत वाढ होते. या पिकाला रासायनिक खतांचे प्रमाण खालील प्रमाणे द्यावे.

| खते देण्याची वेळ | नत्र/हेक्टरी | स्फुरद/हेक्टरी | पालाश/हेक्टरी |
|---|---|---|---|
| लागवडीच्या वेळी | २ बॅग १९ किलो यूरिया | ६ बॅग १३ किलो फॉस्फेट (SSP) | १ बॅग ३६ किलो पोटॅश |
| लागवडीनंतर ३० दिवसांनी | १ बॅग ९ किलो यूरिया | --- | --- |
| लागवडीनंतर ४५ दिवसांनी | १ बॅग ९ किलो यूरिया | --- | --- |

**✲ फर्टीगेशन द्वारे खत व्यवस्थापन**

| टप्पा | पीक अवस्था | खत ग्रेड | खत/हेक्टरी |
|---|---|---|---|
| १ | रोपे लागवड ते रोप वाढीची अवस्था | १९:१९:१९ | २०.०५ किलो |
| | | MN | ८.८८ किलो |
| | | १३ : ००:४५ | १४.८६ किलो |
| २ | फुलकळी ते फुलोरा अवस्था | १२: ६१:०० | १३.११ किलो |
| | | १३:००:४५ | ७१.०४ किलो |
| | | यूरिया | ८०.७२ किलो |
| ३ | फळे येण्याची अवस्था | १९:१९:१९ | २१.०५ किलो |
| | | १३:००:४५ | ४४.४० किलो |
| | | यूरिया | ५६.९१ किलो |
| ४ | फळांची काढणी अवस्था | १२:६१:०० | ६.५२ किलो |
| | | १३:००:४५ | ३५.५२ किलो |
| | | यूरिया | ४०.३८ किलो |

रासायनिक खतामध्ये सिंगल सुपर फॉस्फेट @ ३७५ किलो/हेक्टर लागवडी अगोदर द्यावे.१९:१९:१९ = ४२ किलो/ हेक्टर, १३ : ००:४५ = १६५ किलो/हेक्टर, १२:६१ : ०० = २० किलो/हेक्टर, यूरिया = १७८ किलो/हेक्टर हे चार टप्यामध्ये वरीलप्रमाणे द्यावे (५ ते ७ दिवसांच्या अंतराने विभागून द्यावे.)

**✲ पाणी व्यवस्थापन :** बागायती मिरची पिकाला जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाणी द्यावे. प्रमाणापेक्षा जास्त किंवा कमी पाणी देऊ नये. रोपे लावणीनंतर १० दिवसात शेतात रोपांचा जम बसतो. या काळात १ दिवसाआड पाणी द्यावे. त्यानंतर ५ दिवसांच्या किंवा एक आठवड्याच्या अंतराने पाणी द्यावे. शेतात पाणी साचु देऊ नये कारण त्यामुळे बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होतो.

**✲ तण नियंत्रण व आंतरमशागत :** पेंडीमेथालिन @ १ लीटर/एकर किंवा फ्लुक्लोरालिन @ ८०० मिली/एकर हे तणनाशक म्हणून वापरावे आणि त्यानंतर लागवडीनंतर ३० दिवसांनी एकदा हाताने खुरपणी करावी. त्यानंतर तणांच्या तीव्रतेनुसार खुरपण्या करुन शेत तणविरहीत ठेवावे. खरीप मिरची लागवड नंतर २ ते ३ आठवड्यांनी रोपांना मातीची भर द्यावा. बागायती पिकांच्या बाबतीत रोपांच्या लागवडीनंतर २ महिन्यांनी हलकी खोदणी करुन सरी फोडून झाड्यांचा ओळीच्या दोन्ही बाजूंनी मातीचा भर द्यावा.

**✲ काढणी :** मिरचीची काढणी मिरचीच्या हेतुनूसार केली जाते. मिरचीची पावडर आणि कोरडी मिरची तयार करण्यासाठी मिरची गडद लाल रंगाची झाल्यावर फळे काढली जातात. पूर्ण वाढलेल्या हिरव्या फळांची तोडणी देठासह दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने करावी. हिरव्या मिरचीची तोडणी लागवडीपासून ६० ते ७० दिवसांनी सुरु होते. पुढे तीन-चार महिने तोडे सुरु राहतात. सर्वसाधरणपणे आठ ते दहा तोडे मिळतात. तोडणी नियमित अंतराने करावी.

**✲ उत्पादन :** हिरवी मिरची : १५० ते २०० क्विंटल/हेक्टर, लाल वाळलेली मिरची :१५ ते २० क्विंटल/हेक्टर

भाकृअनुप
ICAR


- ✲ प्रस्तावना
- ✲ हवामान
- ✲ जमीन
- ✲ पूर्वमशागत
- ✲ सुधारित जाती
- ✲ बियाण्यांचे प्रमाण
- ✲ संजीवकाचा वापर
- ✲ रोपे तयार करणे
- ✲ बीजप्रक्रिया
- ✲ लागवड तंत्र
- ✲ खत व्यवस्थापन
- ✲ पाणी व्यवस्थापन
- ✲ तण नियंत्रण व आंतरमशागत
- ✲ काढणी
- ✲ उत्पादन



डॉ.हेडगेवार सेवा समिती,नंदुरबार

**कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार**

मु.पो.कोळदा ता.जि.नंदुरबार -४२५ ४१२
(महाराष्ट्र)
डॉ.वैभव गुर्वे, मो.नं.९६६५२०९७९९

Email
kvk_ndb@yahoo.com
Ph.No.(02564) 299315
Website: Nandurbar.kvk8.in



डॉ.हेडगेवार सेवा समिती,नंदुरबार

**कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार**

मु.पो.कोळदा ता.जि.नंदुरबार




# मिरची लागवड तंत्रज्ञान


**डॉ.वैभव गुर्वे**
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

**श्री.राजेंद्र दहातोंडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख